# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्य

**डॉ. निता मेश्राम** सहयोगी प्राध्यापक महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा

---

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय घटनेचे शिल्पकार, कायदेपंडित, अस्पृश्याचे जनक, दलितांचे उद्धारकर्ते, थोर अर्थशास्त्रज्ञ अशा अनेक प्रकारे ओळखतो. त्यांनी केलेले सामाजिक कार्य, भारतीय घटनेला दिलेले योगदान आपण सर्व नेहमी ऐकतच असतो वा वेगवेगळ्या माध्यमातून वाचत असतो. परंतु, याही पलीकडे अशा थोर महामानवांच्या दैनंदिन सवयी, ते कसे वागत, कसे राहत, कसे बोलत, त्यांना कोणकोणत्या सवयी होत्या, त्यांच्या आवडीनिवडी काय हात्या त्याच्यावर कोणत्या विचारप्रणालींचा प्रभाव होता.हे जाणून घेणे आवश्यक आहे.डॉ आंबेडकर संत वचनांचा अर्थपूर्ण उपयोग लिखनात

करत असत. तुकारामांच्या अभंग पंक्ती त्यांच्या अनेक लेखात विखुरलेल्या दिसतात डॉ आंबेडकरांचे नेतृत्व जेव्हा उदयास आले त्या काळात बहुसंख्य बहुजन वर्ग भक्ती परंपरेवर श्रद्धा ठेवणारा होता तेव्हा त्यांनी हिंदू परंपरेतील भक्ती परंपरा निवडली वारकरी परंपरा समतेची होती डॉ आंबेडकरांनी समतेचे तत्व संत साहित्य आणि संत परंपरेचा गौतम बुद्धाशी असलेला संबंध अशा तीन पद्धतीने विवेचन केले आहे तसेच समता प्रस्थापित करण्यासाठी हा मार्ग निवडला आहे.

**बीजशब्द**

साहित्य, संत,विपुल,मुखपत्र,प्रबोधन, ओवी,किर्तन

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काव्य, कथा, नाटक इत्यादी प्रकारच्या साहित्याची कोणतीही रचना केली नाही, परंतु त्यांच्या लेखणीतून विपुल साहित्याचे सृजन झाले आहे. त्यांचे साहित्य मूळात इंग्रजी भाषेतील सखोल अध्ययन व चिंतनानंतर तयार झाले आहे. बाबासाहेबांचे साहित्य जेवढे त्यांच्या वेळी प्रासंगिक होते, त्यापेक्षाही कैक अधिक वर्तमानात प्रासंगिक आहे. आज बाबासाहेबांचे साहित्य व विचार भारतातच नाही तर संपूर्ण जगामध्ये संशोधनाचा विषय बनले आहे. १९ वे शतकात जेव्हा बदलाचे वारे वाहू लागले तेव्हाही सगळ्या सामाजिक, राजकीय चळवळींवर संत विचारांचा प्रभाव होता.

डॉ. आंबेडकरांवरही संत साहित्याचा प्रभाव दिसून येतो.

मुलांमध्ये विद्येची अभिरुची निर्माण व्हावी म्हणून बाबासाहेबांचे वडील सकाळी भजने, अभंग, दोहे म्हणायला लावत. तसेच संध्याकाळी पुन्हा सर्व भावंडांना एकत्र बसवून शिस्तबद्ध रीतीने आणि भक्तीभावाने संतांचे अभंग व कबीराचे दोहे वडील रामजी त्यांना म्हणून दाखवत. अशाप्रकारे बाबासाहेबांच्या मनात वडिलांनी भक्तिमार्गाचे वातावरण निर्माण केले. वडिलांच्या प्रभावामुळे बाबासाहेबांनी मुक्तेश्वर, तुकाराम वगैरे संत कवींची कवने तोंडपाठ झाली. लहानपणी वडिलांच्या संस्कारांमुळे संतकवींची वचने त्यांच्या तोंडात कायमची बसली. "माझ्याइतका मराठी संतकवींचा खोल अभ्यास केलेली फार थोडी माणसे असतील" असे ते आव्हानात्मक रीतीने सांगतात. वडिलांच्या संस्कारांमुळे आपण दारूच्या एका थेंबालाही स्पर्श केला नाही हे ते अभिमानाने सांगतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्य**

**बाबासाहेबाच्या लिखाणात संतांची वचने**

अस्पृश्यांची भाषा संतवाङ्मयाने भारित आहे याची त्यांना जाणीव होती त्यामुळे त्यांच्या लिखाणात संतांची वचने सर्वत्र विखुरलेली दिसतात. मूकनायक या त्यांच्या मुखपत्राचे शीर्षवाक्य म्हणून तर **काय आता करू धरूनिया भीड। निशंक हे तोंड वाजविले।।**

**नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण।**

**सार्थक लाजून हित नव्हे।।**

या तुकोबांच्या ओळी अवतरतात. तर बहिष्कृत भारताचे शीर्षकवाक्य ज्ञानदेवांच्या ओव्यांनी सजलेले दिसते. 'ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा सोडून अन्य सर्व मराठी ग्रंथ समुद्रात बुडवले तरी फारसे बिघडणार नाही' हे त्यांचे मराठी साहित्याबद्दलचे मत धक्कादायक वाटले तरी चिंतनीय आहे. तुकोबांच्या

**ऐसी कळवळ्याची जाती।**

**करी लाभाविण प्रीति।।**

या ओळीचा उपयोग त्यांनी '**कळवळ्याची जाती आणि लाभाविण प्रीति**' असा म्हणीसारखा केलेला आढळतो. **यातिकुळ येथे असे अप्रमाण।**
**गुणांचे कारण असे अंगी।।**
हे चरण तर महत्त्वाचे आहेच. शिवाय
**नवसे कन्यापुत्र होती। तरी करणे लागे पती?**
हा तुकोबांचा अंधश्रध्दानिर्मूलक सवालही ते करतातच. मूकनायकची स्थापना करताना बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुढं आर्थिक प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, राजर्षी शाहू महाराज यांनी अडीच हजार रुपयांची मदत केली होती. मूकनायकचं ब्रीदवाक्य म्हणून बाबासाहेबांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड केली होती. काय करु आता धरुनिया भीड | नि:शंक हे तोंड वाजविले || नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण | सार्थक लाजून नव्हे हित || या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड ब्रीदवाक्य म्हणून करुन बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक सुरु करण्यामागील वैचारिक भूमिका काय असेल याचे संकेत दिले होते.**डॉ. आंबेडकरांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्र्वर, मुक्तेश्वर यांच्या भाषेचा गौरव केला आहे.**बाबासाहेब हे संत गाडगे महाराज यांचे कीर्तन ऐकायला जात. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याही ते सान्निध्यात होते. संतांचे विचार ह्या जगाला तारू शकतात, संतांच्या विचाराप्रमाणे जग चालले तर दिनदुबळयांची सेवा होऊ शकते असे वाटले असेल म्हणूनच डॉ. बाबासाहेब यांनी संतांच्या ओव्या प्रसिद्ध केल्या असाव्यात. दलितांमध्ये साक्षरांची संख्या हजारात 9 इतकी मामुली असतानाही बाबासाहेबांनी पाक्षिकाचा उपद्व्याप केला. त्यामागे त्यांची दूर दृष्टी दिसून येते. साक्षर सवर्णांचा मोठा वर्ग त्यांच्या समोर असावा हे तर उघडचे आहे. तुकाराम महाराजांचा अभंग वापरायचे कारण त्यांना वारकरी संप्रदाय आणि त्याचा प्रभाव याची पूर्ण जाणीव होती. जनसामान्यांच्या प्रबोधनाचे काम करावयाचे तर त्यासाठी त्यांना समजेल अशीच भाषा वापरली पाहिजे. त्या काळात आणि खरं तर आजही तळागाळात वारकरी संप्रदायाने एक अध्यात्मिक सामाजिक परिभाषा रूजवली.आपल्या मुक राहिलेल्या सामाजाच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी आपण नायक बनलोच पाहिजे इतकेच नाही तर प्रत्येक सामान्य मुक जन हा 'मुकनायक' बनला पाहिजे हे त्यांना अभिप्रेत होते. आणि त्यासाठी त्यांनी तुकाराम महाराजांचा अभंग वापरला.
अभंगाच्या पुढच्या ओळी ज्या त्यांनी प्रत्यक्ष वापरल्या नाहीत पण त्यातूनही बाबासाहेबांचा दृष्टीकोन काय आहे हे स्पष्ट जाणवते.
**आले ते उत्तर बोलो स्वामीसवे ।**
**धीट नीट जीवे होऊनिया ॥**
तुका म्हणजे जीवा समर्थांशी गाठी ।
घालावी हे मांडी थापटूनी ॥ 3211॥
वारकरी संप्रदायावर कुणी कितीही टिका केली तरी एक गोष्ट सर्वांनाच मान्य करावी लागते की त्यांनी एका धाग्यात अवघ्या लोकांना बांधून ठेवले. विठ्ठल हे दैवत, महिन्यातील दोन दिवस (एकादशीला) उपवास करणे, मांसाहार न करणे, धुत वस्त्र परिधान करणे, प्रत्येकाच्या ठायी देव आहे हे उमजून एकमेकांच्या पाया पडणे, वर्षातून एक वेळ पंढरीची वारी करणे इतक्या साध्या बाबींवर संप्रदायाचा संपूर्ण डोलारा उभा केला. बाबासाहेबांना ही गोष्ट तीव्रतेने लक्षात आली असणार. आणि म्हणूनच त्यांना आपल्या समाजाच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी तुकारामांच्या ओळी समर्पक पद्धतीने वापराव्या वाटल्या.
बाबासाहेब पुढच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले आणि हे पाक्षिक बंद पडले. पुढे सात वर्षांनी त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले दुसरे पाक्षिक चालू करताना तर बाबासाहेबांनी संत वाङ्मयाचा अभ्यास केल्याचे खैरमोडे यांनी लिहूनच ठेवले आहे. '' वर्तमानपत्र काढण्याचे मुक्रर केल्यानंतर साहेबांनी मराठी भाषेचा व हिंदुस्थानातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा अभ्यास करण्याचे ठरविले. मुकुंदराय, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास इत्यादी संतांचे वाङ्मय विकत घेवून त्याचा अभ्यास पाच-सात महिन्यांत केला.'' आपल्या समाजाच्या दुबळयांचा मुक आक्रोश मांडण्यासाठी मी आवाज उठवणार आहे असे म्हणणारे बाबासाहेब आता मात्र नुसता आवाज उठवून शांत बसण्यास तयार नाहीत. प्रत्यक्ष कृती करण्याची गरज मांडताना ते ज्ञानेश्वरतील कृष्णाने अर्जूनाला केलेल्या उपदेशाचा आधार बाबासाहेब घेतात.
**आता कोदंड घेऊनि हाती । आरूढ पां इये रथी ।**
देई अलिंगन वीरवृत्ती । समाधाने ॥
जगी कीर्ति रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।
इया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ॥

आतां पार्था नि:शंकु होई। या संग्रामा चित्त देई।
एथ हे वांचूनि कांही। बोलो नये॥
(ज्ञानेश्वरी अध्याय 3, ओवी क्र. 189, पारायण प्रत, पृ.70, प्रकाशक-ज्ञानेश्वर मंदिर संस्थान, आळंदी)

कुठलीही शंका मनात न ठेवता तू शस्त्र हाती घे आणि ही पृथ्वी वाचव हा संदेश कृष्णाचा अर्जूनाला जसा आहे तसाच बाबासाहेबांचा त्यांच्या अनुयायांना आहे. कुठलीही शंका मनात न घेता आता शस्त्र हाती घ्या आणि लढा. पण आधुनिक काळातील युद्ध हे शस्त्राने लढण्याचे नसून शिक्षणाने लढावयाचे आहे. त्यामुळे वृत्तपत्राचे शस्त्र त्यांनी हाती घेतले. भारतीय तत्त्वज्ञानात शेवटचे दर्शनकार म्हणजे महात्मा गौतम बुद्ध. नंतरच्या लोकांनी या दर्शनांचा अन्वयार्थ लावणे, त्याची मिमांसा करणे हे काम केले पण पूर्णपणे नविन दर्शन मांडले नाही. या दर्शनकारांची जी विचार मांडणी करण्याची पद्धत आहे त्यात मागचे सगळे खोडून माझेच सगळे खरे असं म्हणण्याची पद्धत नाही. मागचे काय मी स्वीकारत आहे आणि काय नाकारत हे सकारण आणि सविस्तर नोंदवून ठेवण्याची आपली परंपरा आहे. त्यामुळे नविन काही मांडणी करताना जूने काय आहे ते सांगावे लागते. बाबासाहेबांना जी नविन मांडणी करायची होती त्यासाठी जून्यातील जे काय आहे त्याचा आधार घेतला पाहिजे याचीही त्यांना जाणिव होती. स्वाभाविकच वारकरी संप्रदायातील काही बाबी आपण विचारात घेतल्या पाहिजे. हे समजून त्यांनी ज्ञानेश्वर तुकारामांच्या ओळी वापरल्या. आधुनिक म्हणवून घेताना बुद्ध धर्म स्वीकारलेल्या दलितांनी सरसकट सगळ्या जून्या परंपरा मुल्य नाकारायची आणि इतरांनी दलितांना नाकारायचे असला बाष्कळपणा बाबासाहेबांसारख्या विद्वानाला कधीच मंजूर झाला नसता. त्यामुळे त्यांनी बंड करतानाही भारतीय परंपरेतीलच धर्म स्वीकारला. कारण त्यांना आपल्या संस्कृतिची पूर्ण जाण होती.

ज्ञानेश्वरांचा आणि त्यातही परत इतर अभंग किंवा रचना न घेता ज्ञानेश्वरीतीलच ओळ वापरण्यात दुसराही एक अर्थ त्यांना अभिप्रेत असावा. महाभारतावर संशोधन करताना रविंद्र गोडबोले यांनी हे निदर्शनास आणून दिले आहे की यात एकही माणूस 'धर्म' संकल्पनेवर बोलत असताना ब्राह्मणांचा संदर्भ देत नाही. किंवा ब्राह्मणांच्या तोंडी धर्मवचने येत नाहीत. याचाच अर्थ त्यावेळच्या रूढी, परंपरा, धर्म, तत्त्वज्ञान यावर ब्राह्मणेतर समाजाचे वर्चस्व असले पाहिजे. हीच बाब अप्रत्यक्षपणे ज्ञानेश्वर आणि नंतर तो संदर्भ वापरणारे बाबासाहेब यांनाही अधोरेखित करावयाची असावी.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 1953 मध्ये दिल्ली येथे गुरु रविदास महाराज यांची जयंती साजरी केली होती आणि या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरु रविदास महाराज यांना अनटचेबल हा महत्त्वाचा ग्रंथ गुरु रविदास महाराज यांना अर्पण केला, क्रांतिकारी मानवतावादी विज्ञानवादी विचारवंत गुरु रविदास महाराज यांचे विचार आजही एक प्रेरणादायी विचार म्हणून समाजामध्ये ठाम आहेत जातीयवादाच्या विरोधामध्ये त्यांनी ठोस पावले उचलली आणि समाजामध्ये एकता निर्माण व्हावी यासाठी अनेक वेळा त्यांनी प्रयत्न केले.

**जाति जाति में जाति है,**
**जो केतन के पात,**
**रैदास मनुष ना जुड सके**
**जब तक जाति न जात...!**

याचप्रमाणे माणूस देखील जातीजातीमध्ये वाटला गेला आहे.आणि जातीमध्ये वाटल्यामुळे एकमेकांमध्ये द्वेष निर्माण होत आहेत आणि त्यासाठी माणसाने जाती-जातीमध्ये न वाटता एक मनुष्य हीच जात आहे असे गुरु रविदास महाराज यांनी सांगितले. डॉ. आंबेडकर कदाचित समता, बंधुता, प्रजासत्ताक लोकशाही, समाजवादी, वैयक्तिक प्रतिष्ठेचे तर्क श्रीगुरु रविदासांच्या तत्त्वज्ञानातून घेतलेले असावेत. गुरु रविदास हे देशातील अग्रगण्य सामाजिक-धार्मिक क्रांतिकारकांपैकी एक होते ज्यांनी केवळ सामाजिक-धार्मिक असमानतेवरच हल्ला केला नाही तर न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा प्रचार केला जिथे सर्व सहकारी एकोपा राहतील. शेवटी, बोधिसत्व आंबेडकरांनी या उदात्त आदर्शांना भारताच्या राज्यघटनेत समाविष्ट केले. त्यामुळे शंका आणि संघर्ष शांत झाले. गुरु रविदास आणि डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या अनुयायांनी भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी एकजुटीने उभे राहण्यासाठी हे समजून घेतले पाहिजे.

बाबासाहेब आंबेडकर हे गुरू रविदास आणि त्यांची वाणी यांच्या पावलावर पाऊल ठेवणारे समाजवादी लोकशाहीवादी होते.

बेगमपुरा शहर का नाओं, दुख अंधोह नहीं जिस के थाऊं;
ना तस्बीस खिराज ना माल, खौफ ना खत ना तरस जावा!

(माझ्या मुक्कामाचे ठिकाण दु:खमुक्त असावे; तेथे कोणतेही दु:ख किंवा दु:ख नसावे. तेथे कोणीही कोणाच्याही मालमत्तेचा अपमान करू नये आणि कोणतीही भीती किंवा उपकार नसावे) गुरू रविदासजींनी मांडलेल्या राजकीय लोकशाहीचे आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीत रूपांतर करण्यात डॉ. आंबेडकरांना रस होता:

ऐसा चाहूं राज में; जहाँ मिले सबन को ऐन,

छोटे बडे सब साम बसीं; रविदास राहे पर्सन !

(मला असे राज्य आणि शासन हवे आहे की जिथे कोणीही उपाशी राहणार नाही आणि प्रत्येकाला भाकरी आणि लोणी मिळाले पाहिजे. सर्वांनी समानतेने जगले पाहिजे. तरच रविदास सुखी होतील)

थोर गुरूंनी उपदेश केल्याप्रमाणे डॉ. आंबेडकर समाजात सद्भाव आणि बंधुभावासाठी उभे राहिले:

कहे रविदास खालस चमारा, जो हम सेहरी सो भेट हमारा!

(रविदास, शुद्ध चमार म्हणतात की माझे सर्व नागरिक माझे मित्र आहेत)

गुरू रविदासांप्रमाणेच बाबासाहेब हे स्वातंत्र्याचे सर्वात मोठे समर्थक होते, जसे गुरूंनी सांगितले:

भारतीय संत परंपरेत संत गाडगेबाबा हे सर्वांपेक्षा आगळेवेगळे संत आहेत. त्यांची किर्तनशैली सर्वांपेक्षा वेगळी होती. आणि त्यांच्या प्रबोधनात्मक शैलीमुळेच गाडगेबाबा आणि बाबासाहेब आंबेडकर एकत्र आले. मुंबईत जेव्हा जेव्हा गाडगेबाबांचे किर्तन असे तेव्हा बाबासाहेब आवर्जून किर्तनाला उपस्थित राहत. आणि चक्क खाली जमिनीवर बसून सर्वसामान्यांसारखे ते किर्तन ऐकत**.** संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते जरी गुरु शिष्याचे असले तरी त्यांनी कधीच त्याचा देखावा केला नाही. गाडगेबाबांची किर्तने नेहमीच जिव्हाळा, आपुलकी, काळजी, प्रेम, आदर, कळवळा सामंजस्याने भरलेली असत. आणि म्हणून बाबासाहेब गाडगेबाबांच्या किर्तनाला नेहमी हजेरी लावत. बाबासाहेबांच्या विद्वत्तेने आणि प्रभावी व्यक्तिमत्वाने गाडगेबाबा नेहमीच भारावून जात. त्यांच्या कार्याचा फार मोठा प्रभाव गाडगेबाबांवर होता. आणि म्हणूनच ते आपल्या किर्तनात बाबासाहेबांच्या नावाचा

जयजयकार करायला सांगत. त्यांचे विचार कार्य किर्तनाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवीत.

डॉ. आंबेडकरांचे वडील कबीर पंथी होते या परंपरामुळे संत कबीर यांच्या विचारावर डॉ. आंबेडकरांचा विशेष ओढा होता. सं.कबीरांबद्दल त्यांना लहानपणीच माहिती झाली होती. कबीरांच्या जीवनाचा आणि तत्वांचाही परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर मोठ्या प्रमाणात झाला.रवींद्रनाथ टागोर आणि संत कबीरांच्या शंभर कवितांचा अनुवाद इंग्रजीमध्ये केला डॉआंबेडकर लंडन मध्ये राज्यशास्त्राचे विद्यार्थी होते तेव्हा ते वाचक होते आणि नवीन पुस्तकाच्या शोधात होते

जात पंथ न पूछे कोई हरको भजे जो हरका होई हा संत कबीरांचा विचार डॉ आंबेडकरांनी परंपरेतून निवडला होता. कबीरांच्या तात्विक पद्धतीचा अवलंब बाबासाहेबांनी केला.कबीराच्या निर्गुण वादावर डॉ. आंबेडकर प्रभावित झाले होते, त्यांना बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून तेच ज्ञान मिळाले. जातीचा नाश वाचला तर त्यात सामाजिक विचारासंबंधीचे कबीरांचे युक्तिवाद आढळतात आणि ज्या प्रकारे कबीरांनी ब्राह्मणवादाच्या जातीव्यवस्थेवर तार्किक हल्ला केला होता ते कुठेतरी जातीच्या नाशात दिसून येते.आंबेडकरांनी संत साहित्य व संतांचे जातसंस्था विषयक तत्व यामध्ये फरक केला त्यांनी संतांच्या साहित्यामधील लोकशिक्षणासाठी भाग स्वीकारला.

**समारोप:-**

वरील एकंदरीत विवेचनावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील संत साहित्याचा प्रभाव दिसून येतो.अस्पृश्यांच्या उगमासंबंधी मुलगामी आणि चिकित्सा करणारा द अनटचेबल हू आर दे वाय दे विकेम पण टचिवल हा ग्रंथ त्यांनी अस्पृश्य संतांना अर्पण केला आहे. संत नंदनार आर संत रोहिदास संत चोखामेळा हे तीनही संत अस्पृश्य म्हणून जन्माला आले आणि आपल्या पावित्र्याने व सदाचाराने सर्वांच्या बरोबरीचे ठरले त्यांच्या स्मृतीस अर्पण सर्व मराठी पुस्तके व ग्रंथ उद्या कोणी अरबी समुद्रात बुडवून टाकले किंवा जाळून टाकले तरी मला काहीही दु:ख होणार नाही, फक्त दोन अपवाद तुकारामाची गाथा आणि दुसरी ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी या दोन ग्रंथाच्या आधारे माझी मराठी अभिमानाने आणि डोलाने जिवंत राहील. डॉ. आंबेडकरांनी संतांच्या वांग्मयाबद्दल अनेक गौरव उद्गार काढले आहेत. एकंदरीत समतेला पुष्टी देणाऱ्या संत वांग्मयाबद्दल त्यांना आकर्षण असल्याची स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. चांगदेव खैरमोडे डॉक्टर भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड ३ प्रताप प्रकाशन मुंबई १९६७

२. वसंत मून (संपादक( डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई (डॉबाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची चळवळ अभ्यासाची साधने खंड १)

३. संदानंद मोरे तुकाराम दर्शन गाज प्रकाशन पुणे अहमदनगर १९९६
४. शंकरराव खरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा इंद्रायणी साहित्य पुणे १९९७

**निष्कर्ष :-**

१.डॉ आंबेडकर संत वचनांचा अर्थपूर्ण उपयोग लिखनात करत असत.

२. 'ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा सोडून अन्य सर्व मराठी ग्रंथ समुद्रात बुडवले तरी फारसे बिघडणार नाही' हे त्यांचे मराठी साहित्याबद्दलचे मत धक्कादायक वाटले तरी चिंतनीय आहे.

३.डॉ. आंबेडकरांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्र्वर, मुक्तेश्वर यांच्या भाषेचा गौरव केला आहे

४.कबीराच्या निर्गुण वादावर डॉ.आंबेडकर प्रभावित झाले होते, त्यांना बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून तेच ज्ञान मिळाले.

५.भारतीय संत परंपरेत संत गाडगेबाबा हे सर्वांपेक्षा आगळेवेगळे संत आहेत. त्यांची किर्तनशैली सर्वांपेक्षा वेगळी होती. आणि त्यांच्या प्रबोधनात्मक शैलीमुळेच गाडगेबाबा आणि बाबासाहेब आंबेडकर एकत्र आले.

६.डॉ. आंबेडकरांनी संतांच्या वांग्मयाबद्दल अनेक गौरव उद्गार काढले आहेत. समतेला पुष्टी देणाऱ्या संत वांग्मयाबद्दल त्यांना आकर्षण असल्याची स्पष्ट होते.